**(CNR No.:-MHSN06-002345-2018)**
**(महाराष्ट्र शासन विरुध्द संगिता नंदु गायकवाड @ संगिता तानाजी गोसावी–१)**

# नियमित फौजदारी खटला क्रमांक २१८/२०१८ मधील निशाणी १३८ वरील आदेश

(दिनांक १२/०७/२०१९)

१. प्रस्तुतचा अर्ज सहाय्यक पोलीस निरीक्षक, महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे, मिरज यांनी सदर केसच्या कामी तत्कालीन पोलीस निरीक्षक यांनी दिनांक ०५/०५/२०१८ रोजी नोंदवून घेतलेले पिडीतांचे जबाब या कामी दाखल करण्याचे नजरचुकीने राहुन गेले होते व ते दाखल करुन घेण्या विषयी विनंती केलेली आहे.

२. सदर अर्जास आरोपींचे म्हणणे मागविण्यात आले. आरोपींच्या वकीलांचे असे कथन आहे की, दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर अशी कागदपत्रे दाखल करता येणार नाहीत. सदरचे जबाब हे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६१ किंवा १६२ प्रमाणेचे नाहीत. तसेच आरोपींनी आपला बचाव खुला केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा.

३. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे आणि उपलब्ध कागदपत्रे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४. सदरचे कामी पिडीत यांचे जबाब दिनांक ०५/०५/२०१८ रोजी नोंदविल्याचे नमूद केले आहे. सदरचे कामी दोषारोपपत्र हे या न्यायालयामध्ये दिनांक ०९/०७/२०१८ रोजी दाखल करण्यात आलेले आहे. सदर अर्जा सोबत हजर केलेले जबाब पाहता, त्यामध्ये पिडीतांचे जबाब असल्याचे दिसुन

येते. सदरचे कामी दोषारोपत्रामध्ये पिडीतांचे जबाब सामील नाहीत. त्यामुळे सदरची केस गुणावगुणावर चालण्यास सदरचे जबाब दोषारोपपत्रात सामील करणे न्यायोचित होईल. सदर पिडीतांचे जबाब दाखल केल्यास आरोपींचे कोणतेही नुकसान संभवत नाही. याउलट, सदरचे जबाब याकामी सामील न झाल्यास सरकारी पक्षाला त्यांची बाजू मांडता येणार नाही. तसेच, सदर कामी साक्षी घेणे कामी सदरचे जबाब हत्यंत गरजेचे आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज न्यायाचे कारणास्तव मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालीप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर अर्जासोबत दाखल केलेले पिडीतांचे जबाब मूळ दोषारोपपत्रात सामील करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

Nilesh Malakappa Wali
Digitally signed by Nilesh Malakappa Wali
Date: 2019.07.15 14:12:46 +0530

ठिकाण–मिरज. (निलेश एम. वाली)
दिनांक–१२/०७/२०१९. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज.

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : S. P. Pethkar.
Court : Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Miraj.
Judgment/Order signed by the Presiding Officer on : 12/07/2019.
Judgment/Order uploaded on : 14/07/2019.